**// प्रेस नोट //** दिनांक १८/१२/२०१८

**लोकसेवक बाळासाहेब नामदेव सुर्यवंशी, वय ४८ वर्षे, धंदा नोकरी, क्षेत्र सहायक, रेशीम कार्यालय, बीड वर्ग-३, यांना ८,०००/- रुपयाची लाच मागितल्याने गुन्हा दाखल.**

---

दि.१३/१२/२०१८ रोजी यातील दोन्ही तक्रारदार यांनी असीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार यांचे तुती लागवडीचे (रेशीम शेती) व किटक पालनासाठी उभारलेल्या शेडचे उर्वरीत अनुदान मिळणेसाठी दाखल केलेल्या दोन फाईल मंजुर करण्यासाठी रेशीम कार्यालयाचे क्षेत्र सहायक सुर्यवंशी हे ८,०००/- रुपयाची लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक १३/१२/२०१८ रोजी रेशीम कार्यालय येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत पडताळणी केली असता सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी ८,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

परंतु लोकसेवक सुर्यवंशी यांना तक्रारदार यांचा काहीतरी संशय आल्याने त्याने लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरुन **लोकसेवक बाळासाहेब नामदेव सुर्यवंशी, वय ४८ वर्षे, धंदा नोकरी, क्षेत्र सहायक, रेशीम कार्यालय, बीड वर्ग-३,** यांना ८,०००/- रुपयाची लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द पो.स्टे. शिवाजीनगर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस अधीक्षक असीबी औरंगाबाद, मा.श्री.एस.आर.जिरगे, अपर पोलीस अधीक्षक, असीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.गजानन वाघ, व टीम एसीबी बीड यांनी केली आहे.

नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२४४२/२२२६४९ |
| मेल आयडी | :- | dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- | www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

(गजानन वाघ)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

Scanned by CamScanner